# प्रेस नोट ता. ०८/०७/२०१९

## मौज मजेकरीता वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक

हडपसर पोलीस स्टेशन हददीत वाहनचोरीच्या गुन्हे संदर्भात वरिष्ठांचे आदेशान्वये हडपसर पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलींग करीत असताना पो. ना. ६४८९ शिवले, पो.शि. १०१५ कुसाळकर यांना संशयितरित्या इसम नामे आकाश राजु पवार वय २० वर्षे रा.स नं १२, लक्ष्मी नगर, तिरंगा मित्र मंडळाजवळ, येरवडा पुणे हा मोटार सायकलवर फिरत असताना मिळुन आला. त्यानंतर इसम नामे आकाश राजु पवार याचे ताब्यात असलेल्या मोटार सायकलबाबत तपास केला असता त्याने हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ६२२/२०१९ भादविक ३७९ हा गुन्हा केल्याचे सांगत असल्याने त्याला सदर गुन्हयात दिनांक ०७/०७/२०१९ रोजी १७.०५ वाजता अटक केली.

अटक मुदतीत आरोपी नामे आकाश राजु पवार यास अधिक विश्वासात घेवुन तपास केला असता त्याने एकटयाने पुणे शहर व पुणे ग्रामीण परिसरातुन वाहन चोरी केल्याचे सागुन त्याने एकुण ०५ मोटर सायकली असा **एकुण २,००,०००/- रुपये किंमतीचा मूददेमाल** काढुन दिल्याने तो मुददेमाल जप्त करुन ताब्यात घेण्यात आला आहे.

अटक आरोपी याचेकडुन जप्त करण्यात आलेल्या मोटार सायकल बाबत हडपसर, बंडगार्डन व लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपी याचेकडून खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

१) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ६२२/२०१९ भादविक ३७९
२) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ६२३/२०१९ भादविक ३७९
३) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३९७/२०१९ भादविक ३७९
४) बंडगार्डन पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १७६/२०१८ भादविक ३७९
५) लोणीकाळभोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ६२४/२०१८ भादविक ३७९

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो.हवा. ३८६८ सपंत औचरे, पो.हवा. ५५६२ राजेश नवले, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६९२८ पोटे, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो.शि. ८६९२ अकबर शेख,, पो.शि. ८३७६ अमित कांबळे, पो.शि. ८७१४ गायकवाड, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**